## प्रेसनोट

जा.क्र. ३३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०७/२

# भंडारा जिल्हा पोलीसांची रेड स्कॉड कार्यवाही

भंडारा: – दिनांक ०१/०७/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रेड पथक पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा पोउपनि. आडोळे, सफौ. मेहर बं. नं. ५३९, पोना. भालेराव ब. नं. ६८, पो. शि. शिवनकर १०९१, पो. शि. पिंदुरकर बं. नं. २३ यांनी पोलीस स्टेशन पवनी अंर्तगत येत असलेल्या मौजा. मांगली (चौ.) येथील दारु दुकानासमोर एक स्कार्पीओ गाडी क्र. एमएच ३४ के ८९२७ जुनी पुरानी किंमती अंदाजे ५ लक्ष रुपये तसेच सदर वाहनामध्ये देशी दारुने भरलेल्या कागदी खरडयाचे १०० पेटया ज्यामध्ये प्रत्येक खरडयाचे पेटी मध्ये ९० एम. एल. देशी दारु नी भरलेले १०० प्लास्टीक बॉटल, प्रत्येकी बॉटल किंमती २३ रुपये याप्रमाणे एकुण किंमती २,३०,००/–रुपये, असा एकुण ७,३०,०००/–रुपये चा माल मिळुन आल्याने एका पेटीतुन देशी दारुने भरलेला ९० एम. एल. ची एक बॉटल सि. ए. सॅम्पल करीता वेगळी काढुन सिलबंद केले उर्वरीत जप्ती पत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले.

यातील नमुद देशी दारु दुकाणदार यांनी त्यांचे तीन मजुरांना अवैधरित्या स्कार्पीओ वाहनामध्ये विक्री करीता देशी दारुने भरलेल्या पेटया भरण्यास सांगीतल्याने सदर गुन्हयात वाहन चालक, मालक देशी दारु दुकानावर व तीन मजुर मिळुन संगनमताने कटकारस्थान रचुन व शासकीय परवाण्याचे उल्लघंन केल्याचे मिळुन आल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ कलम ६५(ई),७७(अ),८२(१))(ब)अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

पोनी. एम. एम. सिडाम
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र ८६९८७३९१९६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.